स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-१४ जून, २०२३

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) परीक्षांचे निकाल हे विद्यापीठाच्या प्रतिमेशी निगडीत असल्यामुळे ३० दिवसांच्या आत निकाल लागावेत यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळातील सर्व विभाग आणि महाविद्यालये यांनी सामुहिक जबाबदारी स्वीकारुन काम करावे असे आवाहन कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी केले. दरम्यान २९ परीक्षांचे निकाल २० दिवसांच्या आत जाहीर करण्यात विद्यापीठाला यश प्राप्त झाले असून ८२% उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे काम पूर्ण झाले आहे.

कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी बुधवार दि. १४ जून रोजी परीक्षा विभागातील अधिकारी तसेच संगणक विभागातील कर्मचारी यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी विद्यापीठाचे निकाल मुदतीच्या आत लागावेत यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वयाची गरज असल्याचे सांगितले. कुलपती तथा राज्यपाल यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी मुदतीच्या आत निकाल सर्व विद्यापीठांनी जाहीर करावेत, कोणत्याही अडचणी सांगू नयेत अशा सूचना सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंच्या बैठकीत दिल्या असल्यामुळे यापुढे मुदतीच्या आत निकाल लावण्याची जबाबदारी परीक्षा विभाग आणि सर्व महाविद्यालयांनी सामुहिकपणे पार पाडणे गरजेचे आहे. निकालांना कोणत्याही प्रकारे विलंब होऊ नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान अथवा त्यांची ससेहोलपट होऊ नये याची काळजी घेण्यात यावी अशा सूचनाही कुलगुरुंनी या बैठकीत दिल्या. उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे काम वेळेत व्हावे यासाठी सर्व प्राध्यापकांना पत्र लिहून आवाहन केले आहे. ५ वेळा ऑनलाईन बैठका घेण्यात आल्या. अभ्यासमंडळांच्या बैठकां मध्ये सूचना देण्यात आल्या. शिवाय प्राचार्यांच्या बैठकीत आणि पत्र लिहून प्राध्यापकांना मूल्यमापनात सहभागी होण्याच्या सूचना द्याव्यात असे निर्देश दिले आहेत. आपण व प्र-कुलगुरु यांनी मूल्यमापन केंद्रांना भेटी दिल्या आहेत. यासर्व कारणांमुळे मूल्यमापनाचे काम वेगाने होत आहे अशी माहिती प्रा.माहेश्वरी यांनी दिली. प्रारंभी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.दीपक दलाल यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील हे उपस्थित होते. डॉ.मुनाफ शेख यांनी आभार मानले.

दरम्यान विद्यापीठाने विविध विद्याशाखांच्या २९ अभ्यासक्रमांच्या उन्हाळी परीक्षांचे निकाल २० दिवसांच्या आत जाहीर केले आहेत. यामध्ये डीपीए, बीए (ॲडीशनल म्युझीक), एम.एड (व्दितीय वर्ष), एम.ए. उपयोजित भूगोल व्दितीय वर्ष, एम.एस्सी. उपयोजित भूगोल व्दितीय वर्ष, एम.एस्सी.बायोटेक व्दितीय वर्ष, एम.एस्सी. पर्यावरणशास्त्र व्दितीय वर्ष, एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी व्दितीय वर्ष, एम.एस्सी. एनर्जी स्टडीज व्दितीय वर्ष, एम.एस्सी. मटेरीयल सायन्स व्दितीय वर्ष, एम.ए. - डॉ.आंबेडकर थॉटस, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, स्त्री अभ्यास, इंग्रजी, हिंदी, मराठी (सर्व व्दितीय वर्ष), बी.कॉम. प्रथम वर्ष, बी.एस.डब्ल्यू. प्रथम वर्ष, वृत्तपत्र पदविका, एम.ए. जनसंवाद आणि पत्रकारिता दोन्ही वर्ष, बी.लिब., एम.ए. संरक्षणशास्त्र, मानसशास्त्र व संगीत (दोन्ही वर्ष), एम.लिब. या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. दरम्यान ३ लाख

७० हजारांपेक्षा अधिक उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन पूर्ण झाले असून हे प्रमाण ८२% आहे. ३० जूनच्या आत सर्व परीक्षांचे निकाल जाहीर होतील अशी आशा प्रा.दीपक दलाल यांनी व्यक्त केली.

**बातमी क्र.२**

जळगाव दि. १४ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये योग केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ही सर्व योग केंद्र विद्यापीठाच्या योग मार्गदर्शन केंद्राशी समन्वय साधून योगाबाबत जनजागृती करतील.

सन २०१७ मध्ये विद्यापीठात योग मार्गदर्शन केंद्राची स्थापना झाली आहे. या केंद्रामार्फत योग प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु असून लवकरच पदव्युत्तर पदविका व एम.ए. योग शास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहे. भारताच्या आयुष मंत्रालयाने शैक्षणिक संस्थांमध्ये योग केंद्र सुरु करण्याचा आग्रह धरला आहे. त्यादृष्टीने कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी विद्यापीठाशी संलग्नित प्रत्येक महाविद्यालयात योग केंद्र स्थापन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. विद्यापीठाने महाविद्यालयांसाठी कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्या स्वाक्षरीने परीपत्रक काढले आहे. विद्यापीठाच्या योग केंद्राच्या मार्गदर्शनाखाली त्या त्या महाविद्यालयातील योग केंद्राने विविध उपक्रम राबवावे असे अपेक्षित आहे. त्यासाठी विद्यापीठाकडून काही साहित्य, योग पुस्तिका उपलब्ध करुन दिल्या जातील. या योग केंद्राचे नियंत्रण महाविद्यालयाचे क्रीडा संचालक/ विद्यार्थी विकास अधिकारी/ रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचेकडे राहील. या योग केंद्राचा फायदा नॅक मानांकनासाठी तसेच नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अभ्यासक्रमासाठी होणार आहे. दि. २१ जून रोजी जागतिक योग दिन साजरा होणार असून त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने सर्व महाविद्यालयांना परीपत्रक पाठवून या केंद्राविषयीचे सविस्तर निर्देश दिले आहेत अशी माहिती योग मार्गर्शन केंद्र प्रमुख इंजि.राजेश पाटील यांनी दिली.

**बातमी क्र.३**

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेतील एका विद्यार्थिनीची परिसर मुलाखतीव्दारे ग्रोवर ॲण्ड वेल इंडिया लि. मुंबई येथील कंपनीत निवड झाली आहे.

या कंपनीच्यावतीने बी. टेक केमिकल इंजिनियरींगच्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन मुलाखती घेण्यात आल्या. कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक मकरंद वसाणे, मनुष्यबळ विभागाचे मनोज पांडे तसेच कौस्तुभ चॅटर्जी उपस्थित होते. सहा विद्यार्थ्यांपैकी दिशा शर्मा हीची निवड झाली. तिला ५.३८ लाख वार्षिक वेतन देण्यात येणार आहे.

------------------------------------------------------------------------------------------------------------- प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी